मनोरंजनासह प्रबोधनासाठी... दैनिक
# रयत समाचार
epaper.rayatsamachar.com
खिंचों न कमानों को, न तलवार निकालो, जब तोप मुकाबिल हो, तो अख़बार निकालो - अकबर इलाहाबादी
संपादक : भैरवनाथ वाकळे | महाराष्ट्र, गोवा, कर्नाटक राज्यात एकाचवेळी प्रसिध्द होणारे दैनिक
• RNI No. MAHMAR/2011/40847 • वर्ष १३ वे • अंक ४९४ वा • मंगळवार, ता. १३ जानेवारी २०२६ • www.rayatsamachar.com • पाने ४ • मूल्य रु. ४.००

## दरभंगा राजघराण्याच्या अंतिम महाराणी कामसुंदरीजी यांचे निधन

### मिथिलेच्या संस्कृतीचा तेजस्वी दीप विझला




**दरभंगा । रयत समाचार**

ईसमादच्या संपादिका कुमूदसिंह यांच्या आजी तथा बिहारमधील ऐतिहासिक दरभंगा राजघराण्याच्या अंतिम महाराणी, महाराजाधिराज स्व. कामेश्वरसिंह यांच्या धर्मपत्नी महाराणी कामसुंदरी यांचे काल ता.१२ जानेवारी रोजी पहाटे ३ वाजता सकाळी निधन झाले. त्या ९६ वर्षांच्या होत्या. त्यांच्या निधनाने केवळ दरभंगा राजपरिवारावरच नव्हे, तर संपूर्ण मिथिला प्रांतावर शोककळा पसरली. सादगी, उच्च संस्कार, धर्मनिष्ठा आणि लोकमंगल यांचा आदर्श वस्तुपाठ घालून देणारे महारानी कामसुंदरीजी यांचे जीवन मिथिलाच्या गौरवशाली सांस्कृतिक परंपरेचे प्रतीक होते.


राजवैभव असूनही त्यांनी सदैव साधे, संयमी व सेवाभावी जीवन जगणे पसंत केले. त्यामुळे त्या जनसामान्यांमध्ये अत्यंत आदराने ओळखल्या जात होत्या. महारानी कामसुंदरीजी यांनी आयुष्यभर धर्म, संस्कृती, सामाजिक समरसता आणि लोककल्याणाशी नाते जपले. मिथिलातील धार्मिक परंपरा, सांस्कृतिक विधी, मंदिर व्यवस्था तसेच सामाजिक उपक्रमांना त्यांनी मूक पण प्रभावी पाठबळ दिले. त्यांच्या कार्यातून दरभंगा राजघराण्याची नैतिक व सांस्कृतिक ओळख अधिक भक्कम झाली. महारानींचे जाणे म्हणजे केवळ एका व्यक्तिमत्त्वाचे निधन नाही, तर मिथिलाच्या ऐतिहासिक आणि सांस्कृतिक प्रवासातील एका महत्त्वपूर्ण युगाचा अंत असल्याची भावना व्यक्त केली जात आहे. त्यांच्या आयुष्याने राजसत्ता, संस्कृती आणि सेवाभाव यांचा समन्वय कसा असावा, याचा आदर्श समाजासमोर ठेवला. दरम्यान, दरभंगा राज परिवार, सामाजिक संस्था, धार्मिक संघटना तसेच मिथिलावासी नागरिकांकडून शोकसंवेदना व्यक्त करण्यात येत आहेत. अनेक मान्यवरांनी महारानी कामसुंदरीजी यांच्या निधनाला मिथिलेचा सांस्कृतिक दीप विझला असल्याचे नमूद केले आहे.

# डोनाल्ड ट्रम्प व्हेनेझुएलाचे ‘कार्यवाहक राष्ट्राध्यक्ष’

## Truth सोशल मीडियावरुन स्वतः केली घोषणा

**वॉशिंग्टन । रयत समाचार**

अमेरिकेचे माजी राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी व्हेनेझुएलाबाबत वादग्रस्त घोषणा करत स्वतःला त्या देशाचे ‘कार्यवाहक राष्ट्राध्यक्ष’ घोषित केल्याचा दावा केल्याने आंतरराष्ट्रीय राजकारणात मोठी खळबळ उडाली आहे. व्हेनेझुएलाच्या लवाद व घटनात्मक प्रक्रियांकडे दुर्लक्ष करून करण्यात आलेल्या या वक्तव्यावर विविध स्तरांतून तीव्र प्रतिक्रिया उमटत आहेत.




Truth Social या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर ट्रम्प यांनी एक पोस्ट शेअर करत विकिपीडियाच्या अधिकृत पानासोबत स्वतःची डिजिटल स्वरूपात बदललेली प्रतिमा प्रसिद्ध केली आहे. या प्रतिमेखाली ‘Acting President of Venezuela’असा मजकूर देण्यात आला असून, यामुळे ट्रम्प यांच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह उपस्थित झाले आहे. काही दिवसांपूर्वी अमेरिकेने व्हेनेझुएलाचे राष्ट्राध्यक्ष निकोलस मादुरो यांना ताब्यात घेतल्याचा दावा करण्यात आला होता. मादुरो यांच्यावर अमली पदार्थ तस्करीसह विविध आरोपांतर्गत अमेरिकेत खटला चालवण्याची तयारी असल्याचे सांगण्यात आले. त्यानंतर ट्रम्प यांनी अमेरिका व्हेनेझुएलावर नियंत्रण ठेवेल, असे सूचक विधान केले होते. दरम्यान, मादुरो यांना हटवल्यानंतर व्हेनेझुएलाच्या सर्वोच्च न्यायालयाने घटनात्मक अडचणींचा हवाला देत उपराष्ट्राध्यक्ष डेल्सी रॉड्रिग्ज यांना कार्यवाहक राष्ट्राध्यक्ष म्हणून जबाबदारी सांभाळण्याचे निर्देश दिले होते. मात्र, ट्रम्प यांनी या निर्णयाकडे दुर्लक्ष करत स्वतःच ‘कार्यवाहक राष्ट्राध्यक्ष’ असल्याचा दावा केल्याने वाद अधिक चिघळला आहे. यापूर्वी ३ जानेवारी रोजी अमेरिकेने व्हेनेझुएलावर हल्ला केल्याचे वृत्त समोर आले होते. राजधानी काराकासमधून मादुरो यांना ताब्यात घेण्यात आल्याची चर्चा झाली होती. त्यानंतर ट्रम्प यांनी पत्रकार परिषदेत ‘‘तेलाचा पुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी बदलाच्या काळात अमेरिका व्हेनेझुएलाचे संचालन करेल,’’ असे वक्तव्य केले होते.

४ जानेवारीला त्यांनी अमेरिका व्हेनेझुएलाची ‘प्रभारी’ असल्याचेही जाहीर केले होते. मात्र, अमेरिकेचे परराष्ट्र मंत्री मार्को रुबियो यांनी अमेरिकेचा थेट नियंत्रणाचा कोणताही इरादा नसल्याचे संकेत दिले होते. ट्रम्प यांच्या ताज्या घोषणेमुळे मात्र, अमेरिकेचे व्यावसायिक व धोरणात्मक हितसंबंध पूर्ण होईपर्यंत व्हेनेझुएलावर नियंत्रण ठेवण्याचा प्रयत्न सुरू असल्याची चर्चा रंगली आहे. ट्रम्प यांच्या या भूमिकेवर अनेक देश, राजकीय विश्लेषक व आंतरराष्ट्रीय संस्थांकडून टीका होत असून, हा प्रकार नव्या साम्राज्यवादाकडे नेणारा असल्याचे मत व्यक्त केले जात आहे.

## ‘मी मुंबईला येतोय, माझे पाय छाटून दाखवा’

### अण्णामलाई यांनी ठाकरे बंधूंना पुन्हा डिवचले



**मुंबई । रयत समाचार**

महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर मुंबईतील राजकारण तापले असतानाच भाजपाचे नेते के. अण्णामलाई यांनी ठाकरे बंधूंना खुले आव्हान दिले आहे. ‘‘मी मुंबईला येतोय, माझे पाय छाटून दाखवा,’’ असे म्हणत अण्णामलाई यांनी राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांच्या टीकेला प्रत्युत्तर दिले. अण्णामलाई यांनी यापूर्वी केलेल्या ‘‘मुंबई महाराष्ट्राचे शहर नाही’’ या वक्तव्यावरून राजकारण चांगलेच तापले. त्यानंतर मुंबईत ठाकरे बंधूंची जाहीर सभा झाली. या सभेत राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे यांनी अण्णामलाई यांच्या वक्तव्यावरून भाजपावर जोरदार टीका केली होती. त्यानंतर अण्णामलाई यांनी प्रतिक्रिया देत आपल्याला धमकावले जात असल्याचा आरोप केला.राज ठाकरे यांच्या टीकेला उत्तर देताना अण्णामलाई म्हणाले की, ‘‘आदित्य ठाकरे आणि राज ठाकरे कोण आहेत जे मला धमकावतात? मला शेतकऱ्याचा मुलगा असल्याचा अभिमान आहे. काही लोक म्हणतात मी मुंबईत आलो तर माझे पाय छाटतील. मी मुंबईला येतोय, माझे पाय छाटून दाखवा. धमक्यांची भीती असती तर मी माझ्या गावातच राहिलो असतो.दरम्यान, संजय राऊत यांनी पत्रकार परिषदेत अण्णामलाई यांच्या वक्तव्यावर तीव्र आक्षेप घेतला. ‘‘मुंबई महाराष्ट्राची नाही असे विधान करणे म्हणजे १०६ हुतात्म्यांचा अवमान आहे. अशा वक्तव्यावर मुख्यमंत्र्यांनी गुन्हा दाखल करून अण्णामलाई यांना अटक करावी,’’ अशी मागणी राऊत यांनी केली. अण्णामलाई यांनी एका मुलाखतीत ‘ट्रिपल इंजिन सरकार’चा मुद्दा मांडताना ‘‘बॉम्बे हे महाराष्ट्राचे शहर नाही, ते आंतरराष्ट्रीय शहर आहे,’’ असे विधान केले होते.

## लोकसंस्कृतीचे खरे व्यासपीठ म्हणजे ‘आदी लोकोत्सव’– मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत

**काणकोण । प्रभाकर ढगे**

आदर्श युवा संघ, श्री बलराम शिक्षण संस्था तसेच कला व संस्कृती संचालनालय व आदिवासी संशोधन संस्था, गोवा सरकार, जनजातीय कार्य मंत्रालय भारत सरकार यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित रौप्यमहोत्सवी ‘आदी लोकोत्सव२५’ चे भव्य उद्घाटन आदर्शग्राम आमोणेपैंगीण येथे मोठ्या उत्साहात पार पडले. या उद्घाटनप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून गोवा राज्याचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत उपस्थित होते. उद्घाटनप्रसंगी बोलताना मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत म्हणाले की, लोकसंस्कृतीचे खरे आणि प्रभावी व्यासपीठ कुठे असेल तर ते मंत्री डॉ. रमेश तवडकर यांच्या नेतृत्वाखाली साकार होत असलेला आदी लोकोत्सव आहे. गोमंतकीय कलाकारांना येथे महत्त्वाचे स्थान मिळते. युवकांचा मोठ्या प्रमाणावर सहभाग पाहता हा लोकोत्सव म्हणजेच एक युवा उत्सव ठरतो. कला सादरीकरणासाठी उत्कृष्ट व्यासपीठ या लोकोत्सवातून मिळते. भगवान बिरसा मुंडा यांच्या १५० व्या जयंतीनिमित्त संपूर्ण गोव्यात जनजातीय जागृती घडवून आणण्यात मंत्री तवडकर यशस्वी ठरल्याचे त्यांनी नमूद केले. काणकोण मतदारसंघाच्या विकासासाठी रमेश तवडकर हेच खरे आणि सक्षम नेतृत्व असून अंत्योदय तत्वावर चालणारे त्यांचे कार्य सरकारच्या धोरणांशी सुसंगत आहे. प्रत्येक योजना प्रभावीपणे राबवण्याची क्षमता असलेले कुशल नेतृत्व म्हणजे रमेश तवडकर असून युवक सक्षम व कुशल व्हावेत यासाठी ते सदोदित पुढाकार घेतात. बलराम शिक्षण संस्था आणि आदर्श युवा संघ यांचे कार्य संपूर्ण गोमंतकीयांसाठी आदर्शवत असल्याचेही त्यांनी सांगितले. नव्या कुशावती जिल्ह्यामुळे काणकोण मतदारसंघाच्या विकासाला मोठी चालना मिळेल, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला. कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून केंद्रीय राज्यमंत्री श्रीपाद नाईक, समाजकल्याण मंत्री सुभाष फळदेसाई, कला अकादमीचे अध्यक्ष बाबू कवळेकर, राष्ट्रीय एस.टी. मोर्चाचे उपाध्यक्ष रामसिंग राठवा तसेच आयोजन समितीचे अध्यक्ष व कला व संस्कृती खात्याचे मंत्री डॉ. रमेश तवडकर हे विशेष उपस्थित होते. या उद्घाटन सोहळ्याला पैगिंण जिल्हा पंचायत सदस्य अजय लोलयेंकर, पैगिंण पंचायत सरपंच सविता तवडकर, काणकोण नगरपालिकेचे नगराध्यक्ष लक्ष्मण पागी, आगोंद पंचायतीचे सरपंच निलेश पागी, लोलयें पंचायतीच्या सरपंच निशा च्यारी, श्रीस्थळ पंचायत सरपंच सेजल गावकर, आदर्श युवा संघाचे अध्यक्ष चंद्रकांत वेळीप, खोतिगांव पंचायत सरपंच जयेश गावकर, काणकोण भाजप मंडळ अध्यक्ष प्रभाकर गावकर यांच्यासह अनेक मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.



आयोजन समितीचे अध्यक्ष व मंत्री डॉ. रमेश तवडकर यांनी स्वागतपर भाषणात सांगितले की, लोकांचे प्रेम हीच आमची खरी शक्ती आहे. देशाला जगासमोर महागुरू बनविण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी सातत्याने प्रयत्नशील आहेत. काणकोणचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत सदोदित पाठबळ देतात. विरोधकांनी केवळ राजकारणासाठी कुशावती जिल्ह्याला विरोध करू नये, कारण या जिल्ह्याच्या माध्यमातून आदिवासी समाजाचा खऱ्या अर्थाने विकास होणार आहे. समृद्ध काणकोण घडविण्यासाठी सर्व स्तरांतील लोकांचे योगदान तितकेच महत्त्वाचे असून ग्रामीण जनतेचा विकास आणि सुख–समृद्धीसाठी ध्यासाने कार्य सुरू असल्याचे त्यांनी सांगितले. शाश्वत विकासासाठी सत्याच्या मार्गावर चालणे आवश्यक असून त्याची प्रचिती काणकोण मतदारसंघात येत असल्याचेही त्यांनी नमूद केले. केंद्रीय राज्यमंत्री श्रीपाद नाईक यांनी आपल्या भाषणात सांगितले की, रौप्यमहोत्सवी ‘आदी लोकोत्सव२५’ हा संपूर्ण गोमंतकीयांसाठी अभिमानाचा विषय आहे. निसर्गसौंदर्यासोबतच लोकसंस्कृतीची अमूल्य देणगी गोमंतकाला लाभली आहे. आदिवासी समाजाच्या चालीरीती ही गोमंतकीयांसाठी एक मोठी ठेव आहे. आधुनिकतेकडे वाटचाल करताना आपल्या मातीशी नाळ तोडू नका. लोकपरंपरेने नटलेली समृद्ध लोकसंस्कृती आपल्याला लोकशहाणपणाची शिदोरी देते. जातीभेद विसरून गोमंतकीय सण साजरे करतात, हीच गोमंतकीय अस्मिता जपण्याचे कार्य मंत्री डॉ. रमेश तवडकर सातत्याने करीत असल्याचे त्यांनी सांगितले. त्यामुळे आदी लोकोत्सवातून लोकसंस्कृतीचे प्रत्येक पाऊल राष्ट्रीय स्तरावर बोधचिन्ह ठरेल, असेही त्यांनी नमूद केले. यावेळी रामसिंग राठवा, कॅप्टन बॉबी अजमेरा, शिवनाल ब्रम्हा, विवेक नाईक, सिल्व्हिया फर्नांडिस, रेश्मा चणेकर, राजीव सावंत, विजया गौडा, राजेश्वर नाईक, डॉ. सुरेश हेगडे, भट, चित्रा क्षीरसागर, जनादन गौडा, भास्कर नायक करंजी, नरेंद्र गावकर आदी मान्यवरांचा सत्कार करण्यात आला. तसेच मान्यवरांच्या हस्ते बलराम शिक्षण संस्थेच्या ग्रंथांचे प्रकाशन करण्यात आले. संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन संजय गावकर यांनी अत्यंत प्रभावीपणे केले. स्वागत भाषण मंत्री डॉ. रमेश तवडकर यांनी केले, तर आभार प्रदर्शन चंद्रकांत वेळीप यांनी केले.

## प्रत्येक आईने शिवचरित्र आत्मसात करून स्वतः जिजाऊ व्हावे– इंजि. अभिजीत वाघ



**अहमदनगर । आबीद खान**

आज देशात व राज्यात अविश्वासाचे वातावरण निर्माण झाले असून माणुसकी लोप पावत चालली आहे. पुन्हा एकदा सर्वांना एकत्र येऊन राष्ट्र घडवायचे आहे. त्यासाठी घराघरात शिवचरित्र वाचले गेले पाहिजे आणि शिवविचार जागृत होऊन परस्परांतील द्वेष–मत्सर संपला पाहिजे. सर्व समाजात एकोपा निर्माण झाला तरच स्वराज्याची संकल्पना पुन्हा एकदा जागृत होऊन नवीन स्वराज्य निर्माण होईल. त्यासाठी प्रत्येक आईने जिजाऊ होणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन अहमदनगर इतिहास प्रेमी मंडळाचे इंजि. अभिजीत एकनाथ वाघ यांनी केले. १२ जानेवारी रोजी राष्ट्रमाता जिजाऊ मांसाहेब यांच्या जयंतीनिमित्त अहमदनगर इतिहास प्रेमी मंडळ, मराठा सेवा संघ व इतर सामाजिक संघटनांच्या वतीने महाराष्ट्रातील स्वराज्य संकल्पक शहाजीराजे व राष्ट्रमाता जिजाऊ मांसाहेब यांचे एकत्रित शिल्प असलेल्या ऐतिहासिक वस्तूसंग्रहालय येथे अभिवादन करण्यात आले. यावेळी अहमदनगर इतिहास प्रेमी मंडळाचे आसिफ दुल्हेखान, भैरवनाथ वाकळे, युनूसभाई तांबटकर, अबीद दुल्हेखान, संध्याताई मेढे, शफकत सय्यद, आदिल शेख आदी उपस्थित होते.

## जिल्हा परिषद, पंचायत समिती निवडणुकांना १५ दिवसांची मुदतवाढ

**नवी दिल्ली । रयत समाचार**

जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकांसाठी अतिरिक्त १५ दिवसांची मुदतवाढ देण्याची मागणी राज्य निवडणूक आयोगाकडून करण्यात आली होती. या मागणीला आज सर्वोच्च न्यायालयाने मान्यता दिल्याने आयोगाला मोठा दिलासा मिळाला आहे. त्यामुळे ज्या जिल्हा परिषदांमध्ये ५० टक्के आरक्षणाची मर्यादा ओलांडलेली नाही, त्या ठिकाणी निवडणुका पुढील महिनाभरात पार पडणार आहेत. राज्यातील एकूण ३२ जिल्हा परिषदांपैकी २० जिल्हा परिषदांमध्ये ५० टक्के आरक्षणाची मर्यादा ओलांडण्यात आली आहे. त्यामुळे या २० जिल्हा परिषदांव्यतिरिक्त उर्वरित १२ जिल्हा परिषदांमध्ये येत्या काही दिवसांत निवडणूक कार्यक्रम जाहीर होण्याची शक्यता आहे. त्याचबरोबर आरक्षण मर्यादा न ओलांडलेल्या १२५ पंचायत समित्यांच्या निवडणुकाही जाहीर होणार आहेत.. ज्या जिल्हा परिषद व पंचायत समित्यांमध्ये ५० टक्क्यांपेक्षा जास्त आरक्षण आहे, त्या ठिकाणच्या निवडणुका एप्रिल किंवा मे महिन्यात होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. तर ज्या जिल्हा परिषदांमध्ये आरक्षणाची टक्केवारी ५० टक्क्यांपेक्षा कमी आहे, तिथे या आठवड्यातच निवडणूक घोषणा होऊन फेब्रुवारीच्या दुसऱ्या आठवड्यापूर्वी मतदान प्रक्रिया पूर्ण होण्याची शक्यता आहे.



# शब्द–संवेदनांचा उत्सव : मराठी साहित्य व कला सेवेतर्फे २३ वे कविसंमेलन उत्साहात

**मुंबई । गुरुदत्त वाकदेकर**

शब्दांना भावार्थ देणाऱ्या संवेदना, अनुभवांना दिशा देणारे विचार आणि संस्कृतीच्या मुळांशी जोडणारी अभिव्यक्ती यांचा सुरेल संगम साधणारे मराठी साहित्य व कला सेवा आयोजित तेवीसावे कविसंमेलन रविवार, ११ जानेवारी २०२६ रोजी सायंकाळी दादर (पूर्व) येथील इंडियन एज्युकेशन सोसायटी, राजा शिवाजी विद्यालय, हिंदू कॉलनी येथे शिस्तबद्ध, रसिक व साहित्यनिष्ठ वातावरणात यशस्वीरीत्या पार पडले.

नववर्षाच्या प्रारंभी झालेल्या या साहित्यिक सोहळ्याने कवी व रसिकांमध्ये सर्जनशील ऊर्जेचा नवा उत्साह निर्माण केला. गेल्या नऊ वर्षांपासून सातत्याने काव्य, कला व विचारसंवर्धनासाठी कार्यरत असलेल्या मराठी साहित्य व कला सेवा या संस्थेने नवोदित व अनुभवी कवींना समान व्यासपीठ उपलब्ध करून दिले. एकाच कार्यक्रमात प्रत्येक कवीला तीन कविता सादर करण्याची संधी देणारी ही अखंड भारतातील एकमेव संस्था असल्याचे वैशिष्ट्य यावेळी अधोरेखित झाले. ‘‘कविता का लिहावी?’’ या पहिल्या सत्रात आत्मशोध व समाजाशी प्रामाणिक संवाद मांडला गेला, तर दुसऱ्या व तिसऱ्या सत्रात मुक्त विषयांवरील स्वच्छंद व भावपूर्ण अभिव्यक्तीने रसिकांना मंत्रमुग्ध केले. या कविसंमेलनात अशोक सहदेव सुकाळे, आदित्य भालचंद्र कुलकर्णी, एकनाथ शेडगे, कल्पना दिलीप मापूसकर, चंद्रकांत दढेकर (अभिवाचन), जयश्री हेमचंद्र चुरी, नमिता नितीन आफळे (अभिवाचन), प्रतिक्षा पांडुरंग सरमळकर, महेश रामनाथ वैजापूरकर, डॉ. मानसी पाटील, मोहित जनार्दन तांडेल, योगिता दशरथ कदम, विक्रांत मारुती लाळे, विलास मारुती अडसुळे (अभिवाचन), विवेक वसंत जोशी व गुरुदत्त दिनकर वाकदेकर यांनी सादरीकरण केले. स्वामी विवेकानंद विषयावरील अभिवाचन विशेष लक्षवेधी ठरले. कार्यक्रमाचे आस्वादक म्हणून डॉ. अनुज केसरकर व राहुल मुदाळकर यांनी रसग्रहण केले. सूत्रसंचालन डॉ. मानसी पाटील यांनी केले. छायाचित्रण विक्रांत लाळे यांनी केले. कार्यक्रमात साहित्यिक शिस्त व वेळेचे काटेकोर पालन दिसून आले. कार्यक्रमाच्या समारोपप्रसंगी आयोजकांनी पुढील उपक्रमाची घोषणा करत चोवीसावे कविसंमेलन रविवार, ८ फेब्रुवारी २०२६ रोजी आयोजित होणार असल्याची माहिती दिली. साहित्यसंवादाचा हा मंच भविष्यातही मराठी साहित्यविश्वाला नवी दिशा देईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला.





# लोकशाही उत्सव

## अहिल्यानगर महानगरपालिका निवडणूक – २०२५-२६





## मनपा सत्तेच्या चाव्या मविआच्या हाती द्या, भ्रष्टाचारमुक्त प्रशासन देऊ– काळे

**अहमदनगर । रयत समाचार**

महानगरपालिकेच्या सर्वच विभागांमध्ये प्रचंड भ्रष्टाचार व अनागोंदी सुरू असून सत्ताधाऱ्यांचे त्याला अभय आहे. वाढीव घरपट्टी, पाणीपट्टी, 'पे अँड पार्क'च्या माध्यमातून नागरिकांची लूट सुरू आहे. शेवटच्या टप्प्यात दबावतंत्र व आर्थिक प्रलोभन दाखवून मतदारांचा स्वाभिमान विकत घेण्याचा कुटील डाव आखला जाईल आणि पुढील पाच वर्षे वसुलीसाठी भ्रष्टाचार केला जाईल. शहर विकासासाठी ही भ्रष्टाचाराची कीड उखडून फेकावी लागेल. त्यासाठी मनपा सत्तेच्या चाव्या महाविकास आघाडीच्या हाती द्या, असे आवाहन शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) चे महानगर प्रमुख किरण काळे यांनी केले. मध्यवर्ती शहरातील उमेदवारांच्या प्रचार फेरीनंतर मतदारांशी संवाद साधताना ते बोलत होते. यावेळी खासदार निलेश लंके, जिल्हाप्रमुख राजेंद्र दळवी यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (गवई)चे जिल्हाध्यक्ष सुशांत म्हस्के, उपशहर प्रमुख व उमेदवार दिलदार सिंग बीर, उपजिल्हाप्रमुख रावजी नांगरे, उपजिल्हाप्रमुख दीपक भोसले, संपदा म्हस्के, शितल भिंगारदिवे, युवा सेना उपशहर प्रमुख मृणाल भिंगारदिवे, उपशहर प्रमुख मनोज गुंदेचा आदींसह मविआचे पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# मतदारांनी उमेदवारांचा लेखाजोखा तपासावा- आ. जगताप

## प्रभाग १ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाची जाहीर सभा उत्साहात

**अहमदनगर । रयत समाचार**

अहिल्यानगर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२६ च्या पार्श्वभूमीवर प्रभाग क्रमांक १ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या उमेदवारांच्या प्रचारार्थ संग्राम जगताप यांच्या उपस्थितीत भव्य जाहीर सभा मोठ्या उत्साहात पार पडली. या सभेला प्रभागातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. या वेळी प्रभाग क्रमांक १ चे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे उमेदवार संपत बारस्कर, डॉ. सागर बोरुडे, दिपाली बारस्कर आणि ज्योती ढवण यांच्यासह मोठ्या संख्येने कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते. सभेत बोलताना आमदार संग्राम जगताप म्हणाले की, अहिल्यानगर शहर विकासकामांमुळे झपाट्याने बदलत आहे. मतदारांनी उमेदवारांचा लेखाजोखा तपासावा, कारण घड्याळाला मत म्हणजे विकासाला मत आहे. ते पुढे म्हणाले



की, शहरातील डी.पी. रस्त्यांच्या काँक्रिटीकरणाची कामे अंतिम टप्प्यात असून आता पथदिवे बसविण्याचे काम सुरू आहे. लवकरच शहरातील रस्त्यांवर प्रकाशझोत दिसेल. गुलमोहर रोड, पाईपलाईन रोड, कुष्ठधाम रोड आदी उर्वरित डी.पी. रस्त्यांची कामे प्राधान्याने हाती घेण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. निवडणुका विकासाच्या व्हिजनवर लढल्या पाहिजेत. नगरसेवक असा असावा की जो पाच वर्षे नागरिकांसाठी वेळ देऊन त्यांच्या समस्या सोडवेल. शहरात पसरवल्या जाणाऱ्या अफवांवर नागरिकांनी विश्वास ठेवू नये, असेही त्यांनी सांगितले. उमेदवार संपत बारस्कर यांनी सांगितले की, गेल्या दहा वर्षांत आ. संग्राम जगताप यांच्या नेतृत्वाखाली प्रभाग क्रमांक १ मध्ये सर्वांगीण विकासकामे झाली आहेत. चारही नगरसेवकांनी नागरिकांच्या सहकार्याने काम केल्यामुळे आज नागरिक आमच्या पाठीशी ठामपणे उभे आहेत. आगामी काळात पर्यावरण, स्वच्छता, पाणी, वीज, रस्ते आणि नागरिकांची सुरक्षा यावर विशेष लक्ष देण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. दिपालीताई बारस्कर यांनी प्रभाग क्रमांक १ हा नव्याने विकसित होणारा भाग असल्याने मूलभूत सुविधांसाठी नियोजनबद्ध व कायमस्वरूपी उपाययोजनांवर भर दिल्याचे सांगितले. भिस्तबाग महाल परिसराच्या सुशोभीकरणाचे काम सुरू असून हे ठिकाण शहर व जिल्ह्याचे पर्यटन स्थळ ठरेल, तसेच पाणीपुरवठ्याचा प्रश्नही कायमस्वरूपी मार्गी लावण्यात आल्याचे त्यांनी नमूद केले. यावेळी उमेदवार डॉ. सागर बोरुडे व ज्योतीताई ढवण यांनी प्रभागातील विकासकामांचा सविस्तर लेखाजोखा मांडला. सभेच्या शेवटी नागरिकांनी घड्याळ चिन्हावर विश्वास ठेवून राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या उमेदवारांना मोठ्या मताधिक्याने विजयी करण्याचा निर्धार व्यक्त केला.

## परिवर्तनाच्या विचारधारेतून सपाचा विकासाचा संकल्प



**अहमदनगर । रयत समाचार**

अहिल्यानगर महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२६ च्या पार्श्वभूमीवर प्रभाग क्रमांक ४ मुकुंदनगरसाठी समाजवादी पक्षाने आपला सर्वसमावेशक व लोकाभिमुख जाहीरनामा जाहीर केला आहे. ''परिवर्तन नामा'' या ब्रीदवाक्याखाली सादर करण्यात आलेल्या या जाहीरनाम्यात सामाजिक न्याय, शिक्षण, आरोग्य, रोजगार, स्वच्छता, सुरक्षा आणि युवक सक्षमीकरणावर विशेष भर देण्यात आला आहे. या जाहीरनाम्यात महिलांचे सक्षमीकरण, अल्पसंख्याक व दुर्बल घटकांच्या विकासासाठी ठोस उपाययोजना तसेच समाजातील शेवटच्या घटकापर्यंत विकास पोहोचवण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला आहे. आरोग्य क्षेत्रात महानगरपालिकेच्या दवाखान्यांचे आधुनिकीकरण, गरीबांसाठी सुलभ उपचार आणि माता-बाल आरोग्य सेवांचा विस्तार करण्याचे आश्वासन देण्यात आले आहे. शिक्षण व ज्ञान परिवर्तनांतर्गत शाळांची गुणवत्ता वाढवणे, डिजिटल शिक्षण सुविधा, विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी उपक्रम तसेच आधुनिक सार्वजनिक वाचनालयांची उभारणी यांचा समावेश आहे. रोजगार व कौशल्य विकासासाठी युवक-युवतींसाठी प्रशिक्षण केंद्रे, स्वयंरोजगाराच्या संधी आणि स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र सुरू करण्याचा संकल्प जाहीरनाम्यात नमूद आहे. नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी पोलीस यंत्रणा बळकट करणे, सीसीटीव्ही व्यवस्था व आधुनिक प्रशासन प्रणाली राबवणे, तसेच स्वच्छ पाणीपुरवठा, सांडपाणी व्यवस्थापन, स्वच्छता व पर्यावरणपूरक सुविधा विकसित करण्यावर विशेष लक्ष देण्यात आले आहे. क्रीडा व युवक विकासासाठी विविध खेळांसाठी मैदाने आणि युवकांसाठी व्यायाम व जिमिंग ट्रॅक उभारण्याचाही प्रस्ताव मांडण्यात आला आहे. समाजवादी पक्षाचे अधिकृत उमेदवार आयेशा जहागीरदार, आसिफ सुलतान, डॉ. शबनम शेख व डॉ. इम्रान शेख यांनी हा जाहीरनामा जनतेसमोर मांडत ''सायकल'' या पक्षचिन्हासमोर मतदान करून परिवर्तनाला बळ देण्याचे आवाहन केले. मुकुंदनगरचा सर्वांगीण विकास साधण्यासाठी हा जाहीरनामा मार्गदर्शक ठरेल, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

## नागरिकांच्या मतरूपी आशीर्वादातून प्रभागाचा सर्वांगीण कायापालट – सुवर्णा जाधव

**अहमदनगर । रयत समाचार**

शिवसेना पक्षप्रमुख व महाराष्ट्राचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेना (धनुष्यबाण) पक्षाच्या प्रभाग क्रमांक १५ मधील उमेदवार सुवर्णाताई दत्ता जाधव यांनी प्रभागाच्या सर्वांगीण विकासाचे व्हिजन मांडले आहे. गेल्या दहा वर्षांपासून नियोजनबद्ध व कायमस्वरूपी विकासकामांमुळे नागरिकांचा विश्वास संपादन केला असून, नागरिकांच्या मतरूपी आशीर्वादातून प्रभागाचा कायापालट करण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला. सुवर्णाताई जाधव म्हणाल्या की, प्रभागातील नागरिक हे जाधव कुटुंबाचे सदस्य असून आत्मीयतेचे ऋणानुबंध जुळलेले आहेत. मागील दोन कार्यकाळात राबविलेल्या विकासकामांमुळे नागरिकांचा विश्वास मिळाला असून, त्याच विश्वासाच्या बळावर तिसऱ्यांदा विजयी होण्याचा आत्मविश्वास त्यांनी व्यक्त केला. त्या पुढे म्हणाल्या की, चारही नगरसेवकांच्या सहकार्यातून पुढील पाच वर्षांत केंद्र व राज्य सरकारच्या विविध योजनांचा लाभ प्रत्येक नागरिकांपर्यंत



पोहोचविण्यात येईल. नागरिकांचे प्रश्न महापालिकेच्या सभागृहात ठामपणे मांडून त्यांचे समाधान करण्यात सातत्य राहील. कल्याण रोड परिसराचा उल्लेख करताना त्यांनी सांगितले की, पूर्वी या भागात मूलभूत सुविधा नव्हत्या. मात्र, गेल्या पाच वर्षांत रस्ते, वीज, पाणीपुरवठा, ड्रेनेज आदी सुविधा कायमस्वरूपी मार्गी लावण्यात आल्या आहेत. पुढील काळातही सर्व प्रश्न सोडवून प्रभाग क्रमांक १५ हा शहरातील आदर्श व विकसित प्रभाग म्हणून ओळखला जाईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. आरोग्य व शिक्षणाबाबत बोलताना सुवर्णाताईंनी सांगितले की, महापालिकेच्या माध्यमातून आरोग्य सुविधा सर्वसामान्यांपर्यंत पोहोचविणे तसेच महापालिकेच्या शाळा अत्याधुनिक करून सर्वसामान्य कुटुंबातील मुलांना मोफत व दर्जेदार शिक्षण देण्यासाठी प्रयत्न केले जातील. विद्यार्थी हा उद्याच्या भारताचा आधारस्तंभ असून त्यांच्या शिक्षणासाठी महापालिकेत ठाम आवाज उठविला जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले. नागरिकांच्या दैनंदिन अडचणी सोडविण्यासाठी चारही नगरसेवक तत्पर राहतील. पुढील पाच वर्षांचा विकास आराखडा तयार असून, त्यानुसार प्राधान्याने कामे केली जातील. प्रभाग क्रमांक १५ ला आदर्श, सुरक्षित, सुशोभित व सर्व सुविधांनी युक्त बनवणे हेच उद्दिष्ट असल्याचे सुवर्णाताई जाधव यांनी सांगितले.

## विद्यार्थिनींकडून मतदान जनजागृतीची कलात्मक रांगोळी

### भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूलचा उपक्रम

**अहमदनगर । रयत समाचार**

आगामी महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर नागरिकांमध्ये मतदानाबाबत जागृती निर्माण व्हावी, मतदानाचे महत्त्व समजावे तसेच मतदानाचा टक्का वाढावा, या उद्देशाने अहमदनगर एज्युकेशन सोसायटी संचलित भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूलच्या विद्यार्थिनींनी अभिनव व स्तुत्य उपक्रम राबविला. शाळेच्या परिसरात विद्यार्थिनींनी कलात्मक व संदेशपूर्ण रांगोळी साकारत मतदान जनजागृतीचा प्रभावी संदेश दिला. या रांगोळीमधून 'मतदान करा', 'लोकशाहीचा उत्सव साजरा करा', 'प्रत्येक मत मौल्यवान आहे' असे आशयपूर्ण संदेश चित्ररूपात मांडण्यात आले. रंगसंगती, रेखीव आकृत्या व सामाजिक संदेश यांचा सुरेख मेळ साधत




विद्यार्थिनींनी कला आणि सामाजिक जाणीव यांचे उत्तम दर्शन घडविले. या उपक्रमामुळे शाळेसह परिसरातील नागरिकांमध्ये मतदानाबाबत सकारात्मक चर्चा घडून आली. उपक्रमातून अनेक विद्यार्थ्यांनी मतदानाचे महत्त्व समजून घेतले. साकारलेल्या रांगोळीसमवेत विद्यार्थ्यांनी सेल्फी काढून सोशल मीडियाच्या माध्यमातून मतदानाचा संदेश अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचविण्याचा निर्धार व्यक्त केला. त्यामुळे हा उपक्रम शालेय स्तरापुरता मर्यादित न राहता व्यापक जनजागृतीचे माध्यम ठरत असल्याचे चित्र दिसून आले. या जनजागृती उपक्रमात निर्मिती साळुंके, प्रांजली सपाटे, ज्ञानेश्वरी कवाष्टे, पूजा व्यवहारे, नवीका पितळे, आराध्या ढवळे, वैष्णवी निनाळा, जानवी आठरे, समृद्धी वाघचौरे, जानवी वाघ, संचिता काळे व पूर्वा कानडे या विद्यार्थिनींनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. या उपक्रमासाठी प्राचार्य उल्हास दुगड, उपप्राचार्य कैलास साबळे, पर्यवेक्षक बाळासाहेब वाव्हळ, कल्पना पाठक, वैभव कुलकर्णी तसेच कलाशिक्षक राजकुमार बनसोडे, प्रवीण साळुंके व रांगोळी प्रमुख अर्चना चिदंबर यांचे मोलाचे मार्गदर्शन लाभले. शालेय स्तरावरूनच लोकशाही मूल्यांची रुजवणूक होत असल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त करत विद्यार्थिनींच्या उपक्रमाचे कौतुक केले. भाऊसाहेब फिरोदिया हायस्कूलच्या या उपक्रमामुळे 'मतदान ही आपली जबाबदारी आहे' हा संदेश समाजापर्यंत प्रभावीपणे पोहोचला असून, लोकशाही अधिक बळकट करण्यासाठी अशा उपक्रमांची गरज अधोरेखित झाली आहे.

रयत समाचार Classified छोटी जाहिरात

छोटी जाहिरात, उत्तम प्रतिसाद

खरेदी विक्री | नोकरी विषयक | नावात बदल
आरोग्य विषयक | वाढदिवस | विवाह विषयक




निसार Art
सर्व प्रकारच्या व्यावसायिक क्षेत्रातील वॉल पेन्टीग जाहिरात (भिंत पेंटिंग) साठी राज्यातील नावाजलेले निसार आर्ट
7020356335 | 9860830016
पत्ता : प्लॉट नं.३, नवीन महानगरपालिकेसमोर, औरंगाबाद रोड, अ.नगर.

रावसाहेबचा चहा, एकदा पिऊन पहा!
कोतवाली पोलीसस्टेशन शेजारील सुप्रसिध्द
जगदंबा टी सेंटर
चहा, कॉफी, लेमन टी
शाखा नं.१- माणिक चौक, अ.नगर
शाखा नं.२- वसंत टॉकीजजवळ, भोला पान सेन्टर शेजारी, अ.नगर
प्रो.प्रा. रावसाहेब ठोंबे
97655 58585

हॉटेल भाड्याने देणे
नगर-सोलापूर हायवेपासून पाच मिनिटांच्या अंतरावर असणाऱ्या कानडेमळा येथील सारसनगर चौकातील सुस्थितीत असणारे हॉटेल भाड्याने चालविण्यास देणे आहे. किमान ३० ते ५० लोक एकावेळी बसतील अशी पीओपी आणि लाईट फिटिंगसह बैठक व्यवस्था, व्हेज-नॉन, व्हेजसाठी स्वतंत्र किचन, सर्व किचन साहित्य टेबल, सोफे, पाण्याची व्यवस्था इत्यादीसह देणे आहे.
– संपर्क –
९०११११३७००

सर्व प्रकारच्या छोट्या जाहीरातींसाठी ८८०५४०१८०० | ७७७४००१८०० | ९८२२४९६६६४ या क्रमांकावर संपर्क करा

हे दैनिक प्रकाशक, मालक, संपादक, भैरवनाथ तुकाराम वाकळे, 8805401800 यांनी मुद्रक आबीदखान दुलेखान यांच्या मखदुम प्रिंटर्स,३५८८, माणिक चौक, अहमदनगर येथे छापून तेथेच प्रसिध्द केले. कार्यालयाचा पत्ता : ५, गजानन अपार्टमेंट, झोपडी कॅन्टीन, मनमाडरोड, सावेडी, अहमदनगर-०३.कार्यालय, 8805401800 **Email : rayatsamachar007@gmail.com , उपसंपादक : दिपक शिरसाठ,** 7774001800, **समूह संपादक : प्रभाकर ढगे, पणजी, गोवा,** 9373021584, **गोवा कार्यालय : १३१, गोमंतक प्रेस जवळ, सांतिनेज, पणजी – गोवा, कर्नाटक कार्यालय : श्रीकांत काकतीकर, निवासी संपादक,१९१, बॅ.नाथ पै चौक, पोस्ट ऑफीसच्या मागे, शहापूर, बेळगाव कर्नाटक,** 9036799516,shrikantkaktikar@gmail.com (वाद-विवाद अहमदनगर न्यायालयीन न्यायकक्षेत)

# एकनाथ माध्यमिक विद्यालयात 'सुरक्षित विद्यार्थी, सुरक्षित शाळा' अभियान

**शेवगाव । लक्ष्मण मडके**

येथील एकनाथ माध्यमिक विद्यालयात विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण सुरक्षिततेसाठी व जनजागृतीच्या उद्देशाने 'सुरक्षित विद्यार्थी, सुरक्षित शाळा' या संकल्पनेतून विशेष सुरक्षा प्रबोधन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. विद्यालयातील विद्यार्थी सुरक्षा समिती, रस्ता सुरक्षा अभियान, सखी सावित्री समिती तसेच शाळा स्तर तक्रार निवारण समिती यांच्या वार्षिक कामकाजाचा भाग म्हणून हा कार्यक्रम संपन्न झाला. कार्यक्रमाच्या सुरुवातीस मान्यवर पाहुण्यांचे स्वागत करण्यात आले. प्रास्ताविकात अर्जुन घुगे यांनी आगामी शैक्षणिक सहलीच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांना रस्ता सुरक्षा व वैयक्तिक सुरक्षिततेबाबत योग्य माहिती देणे काळाची गरज असल्याचे नमूद केले. यानंतर शेवगाव तालुका




पोलीस प्रशासनाचे अर्जुन मुंडे यांनी विद्यार्थ्यांना वाहतूक नियमांचे काटेकोर पालन करण्याचे महत्त्व पटवून दिले. रस्ता सुरक्षा अभियानांतर्गत हेल्मेटचा वापर, परवाना नसताना वाहन न चालवणे तसेच वाहतूक संकेतांचे पालन याबाबत त्यांनी सविस्तर मार्गदर्शन केले. शेवगाव तालुका पत्रकार संघाचे अध्यक्ष अजय नजन यांनी सामाजिक सुरक्षिततेवर मार्गदर्शन करत विद्यार्थ्यांनी सदैव जागृत व सतर्क राहावे, असे आवाहन केले. सखी सावित्री समितीच्या माध्यमातून मुलींच्या सुरक्षिततेसाठी तसेच तक्रार निवारण समितीद्वारे विद्यार्थ्यांच्या अडचणी सोडवण्यासाठी शाळा स्तरावर सुरू असलेल्या उपक्रमांचे त्यांनी कौतुक केले. अध्यक्षस्थानावरून बोलताना मुख्याध्यापक माधवराव काटे यांनी शालेय समित्यांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, सुरक्षितता व जबाबदारीची भावना निर्माण करणे हे शाळेचे कर्तव्य असल्याचे सांगितले. अशा मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांना शैक्षणिक सहलीत तसेच दैनंदिन जीवनात स्वतःची सुरक्षा कशी राखावी, याचे योग्य ज्ञान मिळते, असे त्यांनी नमूद केले. या प्रसंगी शिक्षकवृंद दिलीपकुमार रणसिंग, प्रकाश दहिफळे, नवनाथ कदम, देवेंद्र बोडखे, विद्या भागवत, किशोर गोर्डे व अमित दराडे उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी शिक्षकेतर कर्मचारी शेख समद हाजीकदार, दत्तात्रय गुजर, धोंडीराम काळे व संजय मगर यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन नवनाथ कदम यांनी केले, तर समारोपप्रसंगी मुकुंद आरे यांनी पोलीस प्रशासन, मान्यवर पाहुणे व उपस्थितांचे आभार मानले.



# महादजी शिंदे विद्यालयात जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती उत्साहात साजरी

**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

रयत शिक्षण संस्था संचलित श्रीगोंदा येथील संकुलातील महादजी शिंदे विद्यालयात राजमाता राष्ट्रमाता जिजाऊ यांची जयंती तसेच स्वामी विवेकानंद यांची जयंती युवक दिन म्हणून उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी वक्ते शरद शिरसाट यांनी राष्ट्रमाता जिजाऊ यांनी पुण्याचा विकास घडवून आणत स्वराज्य निर्मितीचे महान कार्य केले व स्वराज्याचे दोन छत्रपती घडविले, असे प्रतिपादन केले. विजया शेलार व लालकृष्ण मुळे यांनी मनोगत व्यक्त केले, तर शिक्षिका सीमा जगताप यांनी जिजाऊंच्या जीवनावर आधारित कवितेतून विचार मांडले. विद्यालयातील विद्यार्थी आरुष जगताप याने स्वामी विवेकानंदांच्या वेशभूषेत मनोगत व्यक्त केले. आयुष जगताप, श्रेयश काळे, कृष्णराजे जगदाळे, श्रवण येरकळ व रुद्र होले यांनीही विद्यार्थी मनोगते सादर केली. यावेळी प्राचार्य दिलीप भुजबळ, पर्यवेक्षिका सुनिता काकडे, ज्येष्ठ शिक्षक सुरेश टकले, विलास दरेकर, सुधीर साबळे, सुवर्णा शेलार, विजया शेलार, ज्योत्स्ना लोखंडे, योगिता मुळे, स्वाती नरूटे, मंजुश्री चोर आदी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सार्थक दरेकर यांनी केले, आभार यश गिरमकर यांनी मानले, तर नियोजन इयत्ता ९ ई मधील विद्यार्थी व सांस्कृतिक विभाग प्रमुख कैलास उकिर्डे यांनी केले.

> **स्वामी विवेकानंदांनी जागतिक शिकागो परिषदेत भारतीय संस्कृतीचा इतिहास मांडत, आधुनिक जगाला भारताचा शांतीचा व क्रांतीचा विचारच तारण करील, असा संदेश दिला.**
>
> **बापूराव जाधव**, गुरुकुल प्रमुख



**नगर तालुक्यातील गोरक्षनाथ गड येथे ११ जानेवारी रोजी नाथ जागृती यात्रेचा प्रारंभ झाला. शुभारंभप्रसंगी पंचक्रोशीतील नाथ भक्त मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. ही यात्रा १३ जानेवारी रोजी मच्छिंद्रनाथ गड मायंबा येथे समाप्त होणार आहे.** (छाया : एक्सप्रेस फोटो)

# पतसंस्था स्थैर्यासाठी जिल्हा बँकेची सकारात्मक भूमिका गरजेची- काका कोयटे

**कोपरगाव । किसन पवार**

सहकारी पतसंस्था या ग्रामीण व शहरी भागातील सर्वसामान्यांचा आर्थिक कणा असून त्यांना सक्षम व स्थिर ठेवण्यासाठी जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने सहकार्याची सकारात्मक भूमिका घ्यावी, असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य सहकारी पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष काका कोयटे यांनी केले. अहिल्यानगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकच्या मुख्य कार्यालयात झालेल्या बैठकीत त्यांनी हे मत व्यक्त केले.



बैठकीत पतसंस्थांच्या विविध अडचणींवर चर्चा झाली. फेडरेशनच्या वतीने ठेवींवरील वाढीव व्याजदर, ओव्हरड्राफ्टवर सवलतीचा दर, कर्जसुविधा पूर्ववत करणे आदी मागण्या जिल्हा बँकेकडे मांडण्यात आल्या. या मागण्यांवर सकारात्मक विचार करून योग्य निर्णय घेण्याची ग्वाही जिल्हा बँकेचे चेअरमन चंद्रशेखर घुले पाटील यांनी दिली. जिल्ह्यातील सहकार चळवळ अधिक सक्षम करण्यासाठी बँक सर्वतोपरी सहकार्य करेल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

या बैठकीस फेडरेशन व विविध तालुका पतसंस्था संघटनांचे पदाधिकारी सुरेश वाबळे, वसंत लोढा, बँकेचे संचालक मधुकर नवले, भाऊ पाटील नवले, वासुदेव काळे, मुख्य कार्यकारी अधिकारी रावसाहेब वर्पे, कडूभाऊ काळे, नितीन चासकर तसेच जिल्हा बँकेचे संचालक व अधिकारी उपस्थित होते.

# मानसिक स्वास्थासाठी सक्रिय राहण्याची गरज- घोडेचोर

## बाळासाहेब मांडे यांचा सेवापूर्ती निमित्त सन्मान



**नेवासा । विजय खंडागळे**

सहकार क्षेत्रात कार्यरत नेवासा तालुक्यातील शहापूर येथील कर्तव्यनिष्ठ सचिव बाळासाहेब मांडे यांनी ३५ वर्षांची प्रदीर्घ सेवा पूर्ण करून ३१ डिसेंबर २०२५ रोजी सेवानिवृत्ती स्वीकारली. त्यांच्या सेवापूर्तीनिमित्त आयोजित गटसचिव सन्मान सोहळ्यात सहाय्यक निबंधक देविदास घोडेचोर व तालुका विकास अधिकारी सत्यवान खाटीक यांच्या हस्ते शाल, श्रीफळ, पारंपरिक पोशाख व पुष्पगुच्छ देऊन त्यांचा गौरव करण्यात आला. यावेळी सहाय्यक निबंधक देविदास घोडेचोर म्हणाले की, ठरावीक वयोमानानुसार सर्वच क्षेत्रांत सेवानिवृत्ती येते; मात्र सेवानिवृत्तीनंतरही आनंददायी जीवन जगण्यासाठी नव्या आयुष्याची खरी सुरुवात होत असते. दीर्घ व निरोगी आयुष्यासाठी प्रत्येक क्षण कार्यरत ठेवून प्रकृती व मानसिक स्वास्थ जपण्यासाठी आनंददायी कामांत स्वतःला गुंतवून ठेवण्याची गरज आहे. ते शहापूर येथील सेवा सोसायटीचे सेवानिवृत्त सचिव बाळासाहेब कारभारी मांडे यांच्या सेवापूर्ती निमित्त तालुका विकास जिल्हा बँकेच्या सभागृहात बोलत होते. सत्काराला उत्तर देताना मांडे यांनी, सेवानिवृत्तीमुळे हुरहूर वाटणे साहजिक असले तरी पुढील आयुष्य आनंददायी करण्याचा प्रयत्न करणार असल्याचे सांगितले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी तालुका विकास अधिकारी सत्यवान खाटीक होते. यावेळी झोनल ऑफिसर प्रदीप राऊत, तालुका सचिव आप्पासाहेब बोर्डे, संघटनेचे अध्यक्ष भारत पाटील, सुपरवायझर संदीप आदमाने यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते. सचिव विठ्ठल खाटीक व हिरालाल इथापे यांनी मनोगत व्यक्त केले. तालुक्यातील सर्व सचिव बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते. सेवानिवृत्त मांडे यांनी आपल्या कार्यकाळात सहकार्य करणाऱ्या सर्व सचिव बांधव, अधिकारी व पदाधिकाऱ्यांचे मनःपूर्वक आभार मानले.

# सोनई उर्दू शाळेत फातेमा शेख जयंती उत्साहात साजरी

**नेवासा । आबीद खान**



फातेमा शेख या केवळ पहिल्या मुस्लिम महिला शिक्षिका नव्हत्या, तर त्या समाजपरिवर्तनाच्या अग्रदूत होत्या. सावित्रीबाई फुले यांच्या सोबत त्यांनी शिक्षणाचा दिवा घराघरात पोहोचवला. त्या काळात महिलांचे शिक्षण म्हणजे क्रांती होती आणि फातेमा शेख यांनी ती क्रांती आपल्या कार्यातून घडवली, असे प्रतिपादन शिक्षिका नाजेमा शेख यांनी केले. नेवासा तालुक्यातील सोनई येथील उर्दू शाळेत भारतातील पहिल्या मुस्लिम महिला शिक्षिका फातेमा शेख यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. यावेळी शाळा व्यवस्थापन समितीच्या अध्यक्षा रेश्मा भाभी यांच्यासह समितीचे सदस्य उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना शिक्षणाचे महत्त्व पटवून देत नियमित शिक्षण घेण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे विशेष आकर्षण म्हणून पहिल्या इयत्तेतील विद्यार्थ्यांकडून अक्षरओळख व वाचन करून घेण्यात आले. तसेच शाळेच्या वतीने विद्यार्थ्यांना खाऊचे वाटप करण्यात आले. या कार्यक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये शिक्षणाविषयी उत्साह निर्माण झाला.




# वाणिज्य शाखा विद्यार्थ्यांची 'गोदाकाठ' उपक्रमास अभ्यासभेट

**कोपरगाव । किसन पवार**

के. जे. सोमय्या महाविद्यालय येथील वाणिज्य शाखेचे विद्यार्थी व शिक्षकांनी 'गोदाकाठ' या उपक्रमास अभ्यासभेट दिली. या भेटीतून विद्यार्थ्यांना बचत गटांच्या कार्यपद्धतीचा प्रत्यक्ष अनुभव मिळाला. विद्यार्थ्यांनी विविध बचत गटांच्या स्टॉल्सना भेट देत उत्पादन प्रक्रिया, खर्च नियोजन, विपणन धोरणे व विक्री व्यवस्थापनाबाबत माहिती घेतली. अनेक शिक्षक व विद्यार्थ्यांनी स्थानिक उत्पादनांची खरेदी करून बचत गटांना प्रोत्साहन दिले. कोपरगाव तालुक्याच्या धार्मिक व ऐतिहासिक महत्त्व दर्शविणाऱ्या प्रतिकृती पाहून विद्यार्थी भारावून गेले. सांस्कृतिक वारसा जपण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील राहण्याची भावना त्यांनी व्यक्त केली. रोहित काले यांनी या समूहभेटीचे स्वागत करत विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष अनुभव देणाऱ्या उपक्रमांचे कौतुक केले. या उपक्रमात विभागप्रमुख प्रा. डॉ. संतोष पगारे, प्रा. डॉ. संजय अरगडे, प्रा. डॉ. रवींद्र जाधव, प्रा. अजित धनवटे, प्रा. सुनील गुंजाळ, प्रा. स्वागत रणधीर, प्रा. सोनाली आव्हाड, प्रा. विजय सोमासे व प्रा. हर्षदा पेडणेकर सहभागी झाले. प्राचार्य डॉ. विजय ठाणगे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम पार पडला.



# मोहिनीराज यात्रोत्सवानिमित्त धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन

**नेवासा । विजय खंडागळे**

भगवान श्री मोहिनीराजाच्या २५६ व्या वार्षिक यात्रा महोत्सवाच्या निमित्ताने फेब्रुवारी महिन्यात होणाऱ्या उत्सवासाठीचे निमंत्रण पत्रिका काल श्री गजानन व श्री मोहिनीराजांच्या चरणी अर्पण करण्यात आली. यावेळी संस्थानचे अध्यक्ष रवींद्र जोशी, सचिव जयंत देवचक्के, विश्वस्त बाळासाहेब पाटील, लक्ष्मीकांत गुजराती, अभय गुगळे, मानकरी प्रमोद देशपांडे, अनिल देशपांडे, संजय देशपांडे, पत्रकार अशोकराव डहाळे, सामाजिक कार्यकर्ते दीपक गोसावी, आकाश एरंडे, डॉ. प्रणव जोशी, शनिशिंगणापूर देवस्थानचे माजी कार्यकारी अधिकारी उदयकुमार बल्लाळ तसेच सर्व पुजारी उपस्थित होते. यात्रोत्सव आनंदात, उत्साहात व मंगलमय वातावरणात निर्विघ्न पार पडावा, असे साकडे यावेळी घालण्यात आले. यासंदर्भात झालेल्या आढावा बैठकीत अचूक नियोजन, सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या माध्यमातून सुरक्षा, धार्मिक विधींची आखणी, भक्तांसाठी आवश्यक सुविधा आदी बाबींवर चर्चा करून सूचना देण्यात आल्या. भाविकांनी दर्शनासाठी सहकार्य करण्याचे आवाहन संस्थानच्या वतीने करण्यात आले आहे.

# फातिमाबी शेख यांचे अस्तित्व कायम- डॉ. सबनीस

**श्रीरामपूर । शफीक बागवान**

ग्रामीण मुस्लिम मराठी साहित्य संस्था महाराष्ट्र शाखा अहिल्यानगर आयोजित चौथे युगस्त्री फातेमाबी शेख मुस्लिम मराठी साहित्य संमेलन कवयित्री मेहमूदा रसूल शेख यांच्या अध्यक्षतेखाली, डॉक्टर सलीम सिकंदर शेख यांच्या स्वागताध्यक्ष खाली श्रीरामपूर येथे थाटात संपन्न झाले. यावेळी बोलताना संमेलनाचे उद्घाटक डॉ. श्रीपाल सबनीस म्हणाले की, सावित्रीबाईच्या पत्रामध्ये असणारा फातिमाबी शेख यांचा उल्लेख त्यांच अस्तित्व असणारा महत्त्वाचा पुरावा असल्याचा उल्लेख करून फातिमाबी शेख यांचे काळजातले स्थान कोणीही हिरावून घेऊ शकत नाही.



आज त्यांच्या नावाने साहित्यिक सोहळे साजरे होत आहेत. मुस्लिम मराठी स्त्री साहित्यिक मोठ्या प्रमाणात लिहीत आहेत. हा मराठी सांस्कृतिक संचिताचा गौरव आहे. कार्यक्रमाचे प्रास्ताविक खाजाभाई बागवान व संस्थापक शफी बोल्डेकर यांनी केले.

याच कार्यक्रमात स्पंदन स्मरणिका, युगस्त्री फातिमाबी शेख प्रातिनिधीक काव्यसंग्रह संपादन अनिसा सिकंदर शेख , तसेच त्यांचाच काव्यसप्तक हा काव्यसंग्रह, काळ काळांत, व अहमदनगर साहित्यिक सूची शब्बीर बिलाल, शेवटी सोबत काहीच येत नाही नसीम जमादार, खाजाभाई बागवान लिखीत ''सांस्कृतिक सावल्या समिक्षा ग्रंथ या ग्रंथाचे प्रकाशन डॉ. श्रीपाल सबनीस यांच्या हस्ते करण्यात आले. फातिमाबी शेख साहित्यरत्न पुरस्कार सायराबानो चौगुले यांना तर ॲड. सिकंदर लतीफ शेख यांच्या स्मरणार्थ समाजभूषण पुरस्कार शहाजान शेख व मुख्याध्यापक हुसेनसाब बागवान यांच्या स्मरणार्थ आदर्श शिक्षक पुरस्कार निलोफर फणिबंद यांना प्रदान करण्यात आला.जयंती निमित्त फातीमाबी शेखवर स्पर्धा घेण्यात आल्या ते बक्षीस पात्र यशवंत हिराबाई पगारे , कृष्णा अविनाश क्षीरसागर,ज्योत्स्ना डासाळकर, दादासाहेब शेख यांचा सन्मान करण्यात आला तसेच इख्लास रमजान अंकातील उत्कृष्ट कविता बा.ह मगदूम,सुमैय्या चौधरी,आलिया गोहर यांना सन्मानित करण्यात आले. प्रमुख पाहुणे म्हणून संस्थापक शफी बोल्डेकर, संस्थाध्यक्ष हाशम पटेल, संस्था सचिव डॉ. सय्यद जब्बार पटेल, प्राचार्य इ.जा. तांबोळी ,गझलकार बा. ह. मगदूम, प्रा . सय्यद अल्लाउद्दीन आदि मान्यवर साहित्यिक उपस्थित होते.

# तिळगुळ घ्या, गोड गोड बोला!

भारतीय संस्कृतीत सणांना अतिशय महत्व आहे. प्रत्येक सण विशिष्ट असा संदेश देत असतो. या सणातून एक वेगळीच प्रेरणा मिळत असते. मकर संक्रात हा त्यापैकीच एक सण. मकर संक्रात हा वर्षातील पहिला सण त्यामुळे या सणाचा उत्साह काही निराळाच असतो. मकर संक्रांत हा सण संपूर्ण देशात वेगवेगळ्या नावाने आणि वेगवेगळ्या पद्धतीने साजरा केला जातो. आपल्या महाराष्ट्रात तर या सणाला खूप महत्व दिले जाते. मकर संक्राती म्हणजे सूर्याने मकर राशीत प्रवेश करणे. सूर्य ज्या दिवशी दक्षीयणातून उत्तरायणात मार्गक्रमण करतो त्या तिथीला मकर संक्रांत साजरी केली जाते. ही तिथी कधी १४ जानेवारीला येते तर कधी १५ जानेवारीला येते. यावर्षी ही तिथी १४ जानेवारीला आली आहे. संक्रात ऐन थंडीत येते त्यामुळे हवेत गारवा असतो त्याचा परिणाम आपल्या प्रकृतीवर होतो. त्यामुळे या दिवसात शरीराला उष्ण ठेवण्यासाठी उष्ण पदार्थ खाल्ले जातात. तीळ आणि गूळ यात उष्मांक अधिक प्रमाणात असतो. कदाचित त्यामुळेच मकर संक्रांतीच्या दिवशी तिळगुळ वाटला जातो. संक्रातीच्या दिवशी तीळ आणि गूळ यांच्या वड्या किंवा लाडू एकमेकांना देण्याची पद्धत आहे. तिळगुळ देताना तिळगुळ घ्या गोड गोड बोला असा संदेशही दिला जातो. एकमेकांविषयी स्निग्धता देणारे तीळ आणि गोडवा देणारा गूळ एकत्र आल्याने प्रेमाचे नाते टिकते असे प्रतिकात्मक रूपही या सणाला आहे. एकमेकांशी असलेली कटुता भांडण विसरून एकत्र येण्याचा संदेश देणारा हा सण आहे. मकर संक्रातील विवाहित स्त्रिया एकमेकांना हळदी कुंकू लावून सौभाग्याचे वान देतात. हे सर्व करण्यामागे कोणतीही रूढी परंपरा नसून नव्याने स्वागत आणि त्यातून आनंद घेणे हा आहे.



पूर्वी स्त्रियांना एकत्र येण्याची संधी क्वचितच मिळत असे या सणानिमित्त महिला एकत्र येत असे. आजच्या धकाधकीच्या जीवनातही महिलांना एकत्र येण्याची संधी क्वचितच मिळते त्यामुळे संक्रातीनिमित्त मिळणारी ही आयती संधी महिलावर्ग सोडत नाहीत. मकर संक्रांत हा सण महिलांचा सण असे मानले जात असले तरी लहान मुलेही या सणाची आतुरतेनं वाट पाहत असतात. मकर संक्रांतीच्या दिवशी पतंग उडवण्याची परंपरा आहे.

अनेक गावात पतंगोत्सव आयोजित केला जातो. या दिवशी आकाशात विविध रंगांची, आकाराची पतंगे उडताना दिसतात. पतंगाचे विविध आकार रंग पाहून मन प्रसन्न होते.

एकमेकांशी असलेली कटुता विसरून प्रेमाने वागा असा संदेश देणारी मकर संक्रात म्हणजे आनंदाची पर्वणीच. मकर संक्रांतीच्या सर्वांना हार्दिक शुभेच्छा! तिळगुळ घ्या गोड गोड बोला!!



**श्याम बसप्पा ठाणेदार**
दौंड, जिल्हा पुणे
९९२२५४६२९५

**समाजसंवाद**

# जाएंट्स मेन नूतन कार्यकारिणीचा अधिकारग्रहण सोहळा संपन्न

**बेळगाव । श्रीकांत काकतीकर**

सामाजिक कार्यात अग्रेसर असलेल्या जाएंट्स ग्रुप ऑफ बेळगाव मेन या संस्थेच्या नूतन कार्यकारिणीचा अधिकारग्रहण सोहळा रविवारी सायंकाळी कॅम्प येथील मेसोनिक हॉल सभागृहात पार पडला. यावेळी नूतन अध्यक्ष लक्ष्मण शिंदे यांच्यासह कार्यकारिणी सदस्यांनी पुढील काळात नव्या उपक्रमांचे संकल्प व्यक्त केले. समारंभास जाएंट्स सेंट्रल कमिटीचे सदस्य दिनकर अमीन व जाएंट्स फेडरेशन ६ चे अध्यक्ष पांडुरंग तळेबैलकर उपस्थित होते. त्यांनी अध्यक्ष लक्ष्मण शिंदे, उपाध्यक्ष अरुण काळे व मधु बेळगावकर, सचिव विश्वास पवार, खजिनदार सुनील चौगुले तसेच संचालक विजय बनसुर, पुंडलिक पावशे,




वाय. एन. पाटील, सुनील पवार, राहुल बेळवलकर, आनंद कुलकर्णी, जयवंत पाटील व आकाश लाटुकर यांना कार्याची शपथ दिली. नूतन सदस्यांना संजय पाटील यांनी शपथ दिली. दिनकर अमीन यांनी जाएंट्स मेनच्या सामाजिक कार्याचे कौतुक करत लक्ष्मण शिंदे यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त केला. नूतन अध्यक्ष लक्ष्मण शिंदे यांनी समाजाच्या गरजेनुसार तत्परतेने व कर्तव्यभावनेने कार्य करण्याचा निर्धार व्यक्त केला. मावळते अध्यक्ष यल्लाप्पा पाटील यांनी सहकाऱ्यांचे आभार मानले, तर मृणालिनी पाटील साखरे यांनी नूतन कार्यकारिणीला शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाच्या प्रारंभी दीपप्रज्वलन करण्यात आले. अरुण काळे यांनी स्वागत, मधु बेळगावकर यांनी अतिथी परिचय, मुकुंद महागावकर यांनी प्रास्ताविक केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पुंडलिक पावशे यांनी केले, तर वाय. एन. पाटील यांनी आभार मानले.

## महाराजा शिंदे महाविद्यालयात शालेय हाफ किडो बॉक्सिंग स्पर्धा उत्साहात

**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

महाराजा जिवाजीराव शिंदे महाविद्यालय, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय अहिल्यानगर व श्रीगोंदा तालुका क्रीडा समिती यांच्या संयुक्त विद्यमाने ५ जानेवारी २०२६ रोजी शालेय विभागस्तरीय हाफ किडो बॉक्सिंग स्पर्धा उत्साहात संपन्न झाल्या. या स्पर्धेत पुणे विभागातील पुणे, सोलापूर व अहिल्यानगर जिल्ह्यातील खेळाडूंनी सहभाग घेतला. स्पर्धेचे उद्घाटन महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. प्रकाश



साळवे यांच्या हस्ते झाले. अध्यक्षीय भाषणात त्यांनी हाफ किडो बॉक्सिंग खेळाचे महत्त्व व इतिहास विद्यार्थ्यांना समजावून सांगितला. ज्युनिअर कॉलेज पर्यवेक्षक प्रा. रत्नाकर झीटे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करून शुभेच्छा दिल्या. या स्पर्धेत महाविद्यालयातील आकांक्षा येरकळ (द्वितीय), राम दरेकर (द्वितीय) व प्रथमेश होले (प्रथम) यांनी यश संपादन केले. प्रथम क्रमांक मिळविलेल्या प्रथमेश होले याची राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे.

स्पर्धेचे आयोजन क्रीडा शिक्षक संजय डफळ व संजय पवार यांनी केले. पुणे विभाग प्रमुख उमेश शिंदे, समीर पांढरकर, युवराज पवार व शुभम (सोलापूर) यांनी मार्गदर्शन केले. यावेळी श्रीकांत थोरात, उपप्राचार्य डॉ. नितीन थोरात, डॉ. सुदाम भुजबळ यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. संदीप दरेकर यांनी केले, तर शब्बीर पठाण यांनी आभार मानले.

## गटशिक्षणाधिकारी जाधव यांच्या निलंबनासाठी प्रजासत्ताकदिनी वर्षा बंगल्यावर उपोषणाचा इशारा

**अहमदनगर । रयत समाचार**

पंचायत समिती अहिल्यानगरचे तत्कालीन गटशिक्षणाधिकारी बाबूराव जाधव यांचे तात्काळ निलंबन न झाल्यास २६ जानेवारी २०२६ रोजी मुंबईतील मुख्यमंत्र्यांच्या वर्षा बंगल्यावर बेमुदत उपोषण करण्यात येईल, असा इशारा रिपाई (गवई) चे शहर जिल्हाध्यक्ष विजय शिरसाठ यांनी दिला आहे. यासंदर्भात त्यांनी मुख्यमंत्र्यांना निवेदन सादर केले आहे. निवेदनात म्हटले आहे की, गटशिक्षणाधिकारी बाबूराव जाधव यांनी शिक्षक नेते राजेंद्र निमसे (सहशिक्षक, जि.प. शाळा निंबळक) यांचे निलंबन करण्यासाठी संकलित चाचणी१ (भाषा) विषयाच्या उत्तरपत्रिका अनाधिकाराने ताब्यात घेऊन इतर शाळेतील शिक्षकांकडून २६ ऑक्टोबर २०२४ रोजी तपासून घेतल्या. मात्र, जिल्हा परिषद शिक्षण विभागास २५ ऑक्टोबर २०२४ रोजीच उत्तरपत्रिका तपासून अहवाल सादर केल्याचे दाखवून बनावट कागदपत्रे तयार करण्यात आली, असा आरोप करण्यात आला आहे. याच कथित बनावट अहवालाच्या आधारे तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकारी आशिष येरेकर यांनी पूर्वनियोजित कटकारस्थानातून राजेंद्र निमसे यांचे निलंबन केल्याचा आरोपही निवेदनात करण्यात आला आहे. तसेच विद्यार्थ्यांवर दबाव टाकणे, शासकीय नोंदवहीत खाडाखोड करणे, मूळ तपासणी अहवाल गायब करणे आणि एससीईआरटीच्या ८ जुलै २०२५ च्या स्पष्ट निर्देशांचे उल्लंघन केल्याचेही नमूद करण्यात आले आहे. बाबूराव जाधव यांचे त्वरित निलंबन करण्यात यावे, अन्यथा प्रजासत्ताकदिनी उपोषण करण्यात येईल, असा इशारा विजय शिरसाठ यांनी दिला आहे. या निवेदनाच्या प्रती मुख्य सचिव, प्रधान सचिव (शिक्षण), प्रधान सचिव (ग्रामविकास), शिक्षण आयुक्त, शिक्षण संचालक (प्राथमिक), शिक्षण उपसंचालक (पुणे), जिल्हाधिकारी व पोलीस अधीक्षक अहिल्यानगर यांना देण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले.

## वाघोली शाळेची 'यशस्वी शालेय नेतृत्व' विषयावर राष्ट्रीय सादरीकरणासाठी निवड



**शेवगाव । लक्ष्मण मडके**

वाघोली येथील जिल्हा परिषद केंद्रशाळेची केंद्र सरकारच्या राष्ट्रीय शैक्षणिक नियोजन व प्रशासन संस्था (NIEPA) यांच्या वतीने आयोजित 'यशस्वी शालेय नेतृत्व : एकविसाव्या शतकातील परिवर्तनात्मक मार्ग' या विषयावरील राष्ट्रीय सादरीकरणासाठी निवड झाली आहे. नवी दिल्ली येथील भारत आंतरराष्ट्रीय केंद्रात १७ ते १९ जानेवारीदरम्यान होणाऱ्या कार्यक्रमात शाळेच्या उपक्रमांचे सादरीकरण मुख्याध्यापिका शोभा मंडलिक करणार आहेत. हे सादरीकरण 'विकसित भारत संकल्पना २०४७' अंतर्गत होणार आहे. उमेश भालसिंग व सरपंच सुश्मिता भालसिंग यांच्या मार्गदर्शनाखाली पालक, ग्रामस्थ, शिक्षक व विद्यार्थ्यांच्या सहभागातून शाळेत विविध शैक्षणिक व भौतिक सुविधा उभारण्यात आल्या आहेत. साप्ताहिक श्रमदानामुळे शाळेचा सर्वांगीण विकास झाला असून 'मुख्यमंत्री माझी शाळा सुंदर शाळा' अभियानात जिल्ह्यात प्रथम क्रमांक मिळवून शाळेने ११ लाख रुपयांचे बक्षीस प्राप्त केले आहे. शाळेच्या प्रगतीत प्रमिला गोरे, दीपक भुकन, महेश आहेर, राहुल नजन, मुख्याध्यापिका शोभा मंडलिक, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष ज्ञानेश्वर वाघ व सर्व सदस्यांचे योगदान लाभले आहे. उपक्रमशील शिक्षक उमेश घेवरीकर व राघव नवघरे यांनी तयार केलेल्या डॉक्युमेंटरीचीही राष्ट्रीय स्तरावर निवड झाली आहे. या निवडीबद्दल जिल्हा शिक्षणाधिकारी भास्कर पाटील, डायट प्राचार्य राजेश बनकर, गटशिक्षणाधिकारी शैलेजा राऊळ व केंद्रप्रमुख रघुनाथ लबडे यांनी अभिनंदन केले आहे.



## सहकार चळवळीमुळे महाराष्ट्र समृद्ध– साहेबराव खामकर

**श्रीगोंदा । माधव बनसुडे**

सहकार चळवळीमुळे महाराष्ट्राच्या ग्रामीण भागात आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक विकास होऊन जनसामान्यांची प्रगती झाली आहे, असे प्रतिपादन सहकार भारती चे महाराष्ट्र प्रदेश साखर कारखाना प्रकोष्ठ प्रमुख साहेबराव खामकर यांनी केले. सहकार भारतीच्या स्थापना दिनानिमित्त पुणे येथे आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. ११ जानेवारी हा सहकार भारतीचा स्थापना दिन असून ही संस्था देशपातळीवर कार्यरत आहे. सहकारामुळे महाराष्ट्र समृद्ध झाला असला, तरी सहकारातील दोष दूर करण्यासाठी 'बिना संस्कार, नही सहकार' हे ब्रीदवाक्य रुजविण्याची अत्यंत गरज असल्याचे खामकर यांनी नमूद केले. यावेळी रावळगाव साखर कारखान्याचे अध्यक्ष बबनराव गायकवाड यांनी सहकार क्षेत्रातील उद्योग व्यावसायिक पद्धतीने चालविण्याची गरज व्यक्त केली. विशेषतः साखर उद्योगावरील काही शासकीय नियंत्रणात शिथिलता आणावी, अशी मागणी त्यांनी केली. कार्यक्रमाच्या सुरुवातीला पुणे महानगर साखर कारखाना प्रकोष्ठ समन्वयक बाळ भिंगारकर यांनी प्रास्ताविकात सहकार भारतीच्या कार्याचा आढावा घेतला. वाय. जी. पवार यांनी सहकारामुळे ग्रामीण तरुणांना रोजगार मिळाल्याचे सांगितले. केंद्र सरकारच्या धर्तीवर राज्य सरकार नवीन सहकार धोरण आणत असून, त्या समितीत सहकार भारतीचे महाराष्ट्र प्रदेश महामंत्री विवेक जुगाडे यांचा समावेश झाल्याबद्दल खामकर यांनी अभिनंदन केले. पुणे विभाग प्रमुख गिरीश भवाळकर यांनी शुभेच्छा दिल्या. या प्रसंगी आबासाहेब शिंगोटे, शहाजीराव बोरूडे, नवदीप सोशल फाउंडेशनचे सचिव प्रताप खामकर, प्रा. गहिनीनाथ हुमे, रविंद्र साळुंके आदी उपस्थित होते. पुणे जिल्हा पतसंस्था प्रकोष्ठ सहप्रमुख विनोद अष्टुल यांनी आभार मानले.

# सामाजिक भावभावनांचे चित्रण म्हणजे साहित्य– डॉ. कळमकर

## लेखक–वाचक संवाद कार्यक्रमात रंगली गप्पांची मैफल

**अहमदनगर । रयत समाचार**

साहित्य म्हणजे समाजाचा आरसा असून त्यामध्ये सामाजिक भावभावनांचे वास्तववादी चित्रण जितके प्रभावी असेल, तितके ते साहित्य सकस व वाचकांच्या पसंतीस उतरणारे ठरते. यासाठी लेखक सजग, संवेदनशील आणि सामाजिक बांधिलकी जपणारा असावा.

सध्याच्या काळात सामाजिक समता टिकवण्यासाठी साहित्यिकांची जबाबदारी अधिक वाढली असून सामाजिक समस्यांचा वेध घेणारे लेखन होणे आवश्यक आहे, असे मत सुप्रसिद्ध साहित्यिक व व्याख्याते डॉ. संजय कळमकर यांनी व्यक्त केले. ज्ञानकौशल्य ट्रस्ट तर्फे



आयोजित लेखक–वाचक संवाद कार्यक्रमात ते बोलत होते. रविवारी (११ जानेवारी २०२६) सायंकाळी सावेडी येथील जिल्हा वाचनालय सभागृहात हा साहित्यिक संवाद कार्यक्रम पार पडला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सुप्रसिद्ध नाट्य अभिनेते प्रा. रविंद्र काळे होते. हभप सिद्धीनाथ मेटे महाराज यांनी सूत्रसंचालन केले. ट्रस्टचे अध्यक्ष व लेखक सचिन मोहन चोभे यांनी प्रास्ताविक केले, तर आत्मनिर्धार फाउंडेशनचे अध्यक्ष महादेव गवळी यांनी आभार मानले. यावेळी ज्येष्ठ पत्रकार विठ्ठल लांडगे, लेखक रामदास कोतकर, अशोकराजे निंबाळकर, दीपक कांबळे, पांडुरंग ससे, सुदर्शन शिंदे, संदीप कोकाटे, मारुती खडके, 'वाचनवेल' पुस्तक भिशीच्या संस्थापिका रूपाली सोनवणे तसेच ट्रस्टच्या सचिव माधुरी चोभे आदी उपस्थित होते. डॉ. कळमकर म्हणाले की, सध्या समाजात नवे लेखक घडत आहेत.

साहित्यिक व वाचक यांनीच समाजाची ही धडपड जिवंत ठेवली आहे. नव्या लेखकांनी बहुश्रुत व्हावे, चिंतन करावे आणि समाजातील व्यक्ती व घडामोडींचे सूक्ष्म निरीक्षण करावे. पुरस्कार किंवा कौतुकासाठी नव्हे, तर आत्मसमाधानासाठी लेखन सुरू ठेवावे. समाजाशी सतत संवाद ठेवल्यासच सकस साहित्यनिर्मिती होते.

अध्यक्षीय भाषणात प्रा. रविंद्र काळे यांनी सांगितले की, साहित्यामध्ये विविध रसांची सांगड घालत लेखक आपली भावना व्यक्त करतो. हास्यरसासह मानवी भावभावनांची सरमिसळ वाचकांना आकर्षित करते आणि लेखकवाचक यांच्यात भावनिक नाते निर्माण होते. अशा संवाद कार्यक्रमांतून हे नाते अधिक दृढ होत असल्याने अशा साहित्यिक उपक्रमांची आवश्यकता आहे.





## पी.ए. इनामदार शाळेचा चित्रकला स्पर्धेत १००% निकाल

**अहमदनगर । आबीद खान**

इकरा एज्युकेशन सोसायटी संचलित पी. ए. इनामदार इंग्लिश मिडियम स्कूलचा एलिमेंटरी व इंटरमिजिएट ड्रॉईंग ग्रेड परीक्षेचा निकाल १०० टक्के लागला आहे. एलिमेंटरी परीक्षेसाठी शाळेतील २८, तर इंटरमिजिएट परीक्षेसाठी १७ विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. तसेच शाळेच्या केंद्रावर इतर शाळांतील एलिमेंटरीचे १५२ व इंटरमिजिएटचे ६२ विद्यार्थी परीक्षेस बसले होते. या परीक्षेत खान मसीरा मोहसीन पठाण, शेख आयशा उबेदुल्ला व बागवान इक्रा फिरोज यांनी 'ए' ग्रेड श्रेणीत प्रावीण्य मिळविले. एलिमेंटरी परीक्षेत ८ विद्यार्थी, तर इंटरमिजिएट परीक्षेत ७ विद्यार्थी 'बी' ग्रेड श्रेणीत उत्तीर्ण झाले. यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे अध्यक्ष अब्दुल रहीम खोकर, उपाध्यक्ष इकबाल सय्यद, सचिव विकार काझी, खजिनदार डॉ. खालिद शेख, शाळा संचालक शब्बीर, शाळेचे प्राचार्य युनूस सलीम, उपप्राचार्या शेख फरहाना तसेच सर्व शिक्षकवर्ग यांनी मनःपूर्वक अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या. विद्यार्थ्यांना कलाशिक्षक अमीर खान यांचे मार्गदर्शन लाभले.